# गिव्हादान
# मानवाधिकार धोरण

जानेवारी 2021

Givaudan







# मानवाधिकार धोरणाचा मान राखण्यासाठी आमची बांधिलकी

आम्ही एका मोठ्या हेतूने काम करतो; निसर्गाच्या प्रेमासह अधिक आनंदी;
अधिक निरोगी जीवन घडवणे. चला, आपण एकत्रितपणे कल्पना करूया: जगामध्ये चांगल्या गोष्टी घडवून आणण्यासाठी प्रयत्न करत असताना, आम्ही जिथे कुठे असू तिथे आम्ही आमच्या कृत्यांची जबाबदारी घेतली पाहिजे आणि सहवेदनेने तसेच नम्रतेने काम केले पाहिजे. आमच्या कोणत्याही लहान मोठ्या निर्णयांचा आमच्या
भोवतीच्या लोकांवर होणाऱ्या परिणामांचा आम्ही विचार करतो. यामध्ये
मानवाधिकारांवरील परिणामांचा आणि आमच्या व्यवसायाशी संबंधित कोणत्याही व्यक्तीला (व्यक्तींना) त्रास होणे टाळण्याचा समावेश होतो.

# मानवाधिकारांच्या आदरासाठी आमची बांधिलकी

आमच्या संपूर्ण ग्रुपच्या वर्तनाच्या तत्त्वांमध्ये नमूद केल्यानुसार गिव्हादानने कामगारांच्या अधिकारासह मानवी अधिकारांचा आदर करण्यासाठी स्पष्टपणे बांधिलकी व्यक्त केली आहे[1]. हे मानवाधिकार धोरण आमचे स्टेकहोल्डर्स आणि आमचा स्वत:चा व्यवसाय या दोन्हींसाठी, ही बांधिलकी अधिक स्पष्ट करण्याच्या गरजेवर आधारित आहे. शेवटी, मानवाधिकाराबद्दल आदर ही गोष्ट आमचा व्यवसाय योग्य पद्धतीने करण्यासाठी आणि आमच्या हेतूनुसार काम करण्यासाठी एक आवश्यक मार्गदर्शक  आहे. आमच्या उच्च नैतिक मानकांशी बांधिलकी तसेच आम्ही जिथे काम करतो तिथे आमचे कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार आणि समुदायाबरोबर व्यवहार करताना पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा या गोष्टी आम्हाला एक जबाबदार कॉर्पोरेट नागरिक म्हणून सक्षम करतात.

हे धोरण गिव्हादानचे थेट काम, आमच्या मालकीच्या एंटीटीज आणि आम्ही व्यवस्थापित करत असलेल्या सुविधा यांना लागू होते. आम्ही कामगार अधिकारांचा आदर करण्यासाठी बांधिलकी व्यक्त केली आहे त्यासह आम्ही ज्या मानवाधिकारांचा आदर करतो, त्यांचा आदर करण्याची बांधिलकी आमच्या पुरवठादारांनी व्यक्त करावी अशी आम्ही अपेक्षा करतो आणि त्यांना पाठिंबा देतो. या धोरणानुसार असलेल्या आमच्या समर्पित जबाबदार सोर्सिंग धोरणामध्ये[2] हे नमूद केले आहे.

आम्ही मानवाधिकारांचा आदर करण्याची आमची जबाबदारी जाणतो आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यवसाय आणि मानवाधिकाराच्या मार्गदर्शक तत्त्वांचे, जून 2011 च्या बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठीच्या ओईसीडी मार्गदर्शक तत्त्वांचे आणि मार्च 2017 च्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि सामाजिक धोरणांशी संबधित तत्त्वांच्या त्रिपक्षीय घोषणेचे पूर्णपणे समर्थन करतो आणि त्यांना पाठिंबा देतो.

आम्ही मानवाधिकारांचा आदर करण्यासाठी, आमच्या स्वत:च्या उपक्रमांद्वारे मानवाधिकारांच्या उल्लंघनाचे कारण होणे किंवा त्यासाठी योगदान देणे टाळण्यासाठी यथायोग्य तत्परतेने काम करण्यासाठी बांधील आहोत.
आम्ही मानवाधिकारांचा उल्लेख करतो तेव्हा आम्ही मानवाधिकारांच्या आंतरराष्ट्रीय विधेयकात (मानवाधिकारांच्या वैश्विक घोषणेसह) आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मूलभूत घोषणेत व्यक्त केलेल्या अधिकारांबद्दल आणि कामाच्या ठिकाणच्या अधिकाराबद्दल बोलतो. जिथे आमची स्वत:ची तत्त्वे आणि पद्धती लागू असलेल्या कायद्यांपेक्षा जास्त कठोर असतील आणि लागू असलेल्या मानवाधिकार चौकटीनुसार असतील तिथे आम्ही आमची अंतर्गत उच्च मानके लागू करतो.

मानवाधिकारांना पाठींबा देणे आणि जिथे लागू असेल तिथे त्यांचा प्रचार करण्याच्या आमच्या प्रयत्नाचे मूळ हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक कॉम्पॅक्टच्या दहा तत्त्वांमध्ये तसेच आम्ही स्वाक्षरी केलेल्या डब्ल्यूबीसीएसडीच्या मानवाधिकारांच्या सीईओ मार्गदर्शकामध्ये आहे आणि त्यासाठी आमच्या बांधिलकीचे पालन करण्यासाठी हे प्रयत्न आम्हाला मदत करतात. शाश्वत विकासाची उद्दिष्टे विशेषत: 2, 3, 5, 6, 8 आणि 17 ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठीच्या आमच्या योगदानाचासुद्धा तो एक भाग आहे.



SUSTAINABLE DEVELOPMENT GOALS

उद्दिष्ट 2
शून्य भूक

उद्दिष्ट 3
चांगले आरोग्य आणि स्वास्थ्य

उद्दिष्ट 5
लिंग समानता

उद्दिष्ट 6
स्वच्छ पाणी आणि स्वच्छता

उद्दिष्ट 8
चांगले काम आणि आर्थिक वाढ

उद्दिष्ट 17
उद्दिष्टांसाठी भागीदाऱ्या

[1] आमची वर्तनाची तत्त्वे:https://www.givaudan.com/our-company/responsible-business/code-of-conduct

[2] आमचे जबाबदार सोर्सिंग धोरण : https://www.givaudan.com/files/giv-responsible-sourcing-policy.pdf

# मानवाधिकारासंबंधी महत्त्वाची क्षेत्रे

आमच्या मानवाधिकारांच्या बांधिलकीच्या व्याप्तीमध्ये वर नमूद केल्यानुसार, लक्ष केंद्रित करण्याच्या इतर क्षेत्रांमध्ये खालील क्षेत्रे गिव्हादानसाठी सर्वांत ठळक आहेत. ही क्षेत्रे आमच्या अंतर्गत आणि बाह्य स्टेकहोल्डर्सबरोबर सुरू असलेल्या नियमित कामांचा एक भाग म्हणून ठरवण्यात आली आहेत.



## योग्य कामाचा अधिकार आणि व्यावसायिक आरोग्य तसेच सुरक्षितता

आम्ही नैतिक व्यापाराच्या पुढाकाराच्या (इटीआय) मूलभूत आचारसंहिता तत्त्वांनुसार[3] वागतो आणि कामाची स्थिती, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता, कामाचे तास, वेतन आणि विश्रांतीचा वेळ याच्याशी संबंधित त्याच्या सर्व मानकांचा आदर करतो आणि त्यांचे पालन करतो. स्वीकारार्ह स्थानिक कायदेशीर मानकांनुसार आणि इटीआय आधारित आचारसंहितेनुसार आम्ही निर्वाह वेतन देतो आणि आम्ही काम करत असलेल्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये नियमितपणे वेतन मापदंड तपासतो. आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांकडून स्वीकारार्ह कायदेशीर आणि उद्योगांच्या मानकांपेक्षा जास्त कामाच्या तासांची मागणी करत नाही. स्वीकारार्ह मर्यादेमध्ये असलेले कोणतेही ओव्हरटाईम काम हे पूर्णपणे ऐच्छिक असते आणि त्याचा मोबदला दिला जातो. आम्ही विश्रांतीसाठी पुरेसे पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधेसह नियमित विश्राम उपलब्ध करून देतो.

औद्योगिक वातावरणात आणि हानिकारक रसायनांबरोबर काम करण्याशी संबंधित संभाव्य धोके व्यवस्थापित करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करतो[4]. गिव्हादानमध्ये आमचे 'प्रत्येकाला सुरक्षित घरी पाठवणे, दररोज ' हे उद्दिष्ट आहे . आम्ही हे जाणतो की एखाद्या व्यक्तीच्या एकंदर आरोग्याचा आणि स्वास्थ्याचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे मानसिक आरोग्य आणि आम्ही आमच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या प्रयत्नांचा भाग म्हणून या घटकावर खास भर देतो.

## ग्राहक आरोग्य आणि सुरक्षितता

आमच्या ग्राहकांच्या मानवाधिकारांचा, विशेषत: आमच्या उत्पादनांची सुरक्षितता आणि आमच्या ग्राहकांच्या आरोग्याच्या अधिकारावर होणाऱ्या संभाव्य परिणामाच्याबाबतीतील मानवाधिकारांचा आदर करणे हा आमच्या प्रयत्नांचा अत्यावश्यक भाग आहे. ग्राहकांच्या इच्छित वापरासाठी आमची उत्पादने सुरक्षित आहेत आणि लागू असलेल्या सर्व कायद्यांचे तसेच विनियमनांचे ती अनुपालन करतात, हे सुनिश्चित करायला आम्ही बांधील आहोत. सुगंध आणि स्वाद उद्योगातील एक महत्त्वाची कंपनी म्हणून आम्ही ग्राहकांच्या स्वास्थ्यावर सकारात्मक परिणाम करण्याच्या स्थितीतसुद्धा आहोत आणि आमच्या हेतूंशी जुळणाऱ्या स्वास्थ्याच्या पैलूचा प्रचार करणारी उत्पादने विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे.

## समानता आणि भेदभाव न करणे

गिव्हादानमध्ये आम्ही आमच्या संपूर्ण कंपनीत समानता राबवतो आणि संतुलित, वैविध्यपूर्ण तसेच समावेशक मनुष्य बळ आणि वातावरण तयार करून समानतेच्या तत्त्वाचा आदर करण्यासाठी बांधील आहोत. आमचा असा विश्वास आहे की समानतेमुळे आणि विविधतेमुळे नाविन्याला चालना मिळते आणि त्यामुळे आमच्या कर्मचाऱ्यांबरोबर, ग्राहकांबरोबर आणि भागीदारांबरोबर अधिक जवळची नाती तयार होतात. आम्ही विशेषतः महिला आणि पुरुषांना समान वागणूक लक्ष केंद्रित करतो आणि मानवाधिकारांचे संरक्षण करण्यासाठी, समान आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी आणि समाजात सामाजिक विकासाचा प्रचार करण्यासाठी महिला सबलीकरण आवश्यक आहे, असा आमचा विश्वास आहे. समान मूल्याच्या कामासाठी समान पैसे देण्यासाठी आम्ही पूर्णपणे बांधील आहोत. आमच्या थेट कामाच्या पलीकडे जाऊन, समान संधी आणि स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रचार करण्यासाठी कंपनीच्या विविध कार्यक्रमांद्वारे आम्ही आमच्या पुरवठा साखळीलासुद्धा सहभागी करून घेतो.

कोणत्याही प्रकारच्या भेदभावापासून मुक्त असण्याच्या अधिकाराचा आदर करण्यासाठी आणि सर्व पार्श्वभूमींमधून आलेल्या तसेच सर्व लिंगांच्या व्यक्तींच्या यशाकरता समान संधी देणे सुनिश्चित करण्यासाठी आम्ही पूर्णपणे बांधील आहोत. आम्ही कर्मचाऱ्यांची भरती, नोकरी आणि बढती या गोष्टी पूर्णपणे कामासाठी आवश्यक पात्रता आणि क्षमता यांच्या आधारे करतो आणि वंश, रंग, वय, लिंग, राष्ट्रीय मूळ, धर्म, लैंगिक अभिमुखता किंवा कामगिरीशी असंबंधित इतर कोणतीही श्रेणी याचा विचार करत नाही आणि आमच्या पुरवठादारांनीसुद्धा तसेच करावे, अशी आमची अपेक्षा आहे.

[3] आमचे सामाजिक जबाबदारी स्थिती विधान: https://www.givaudan.com/files/giv-ps-social-responsibility.pdf

[4] आमचे आरोग्य आणि सुरक्षितता धोरण: https://www.givaudan.com/files/giv-ps-environment-health-safety.pdf

# मानवाधिकारासंबंधी महत्त्वाची क्षेत्रे



## संघटना तयार करण्याचे आणि एकत्रितपणे वाटाघाटी करण्याचे स्वातंत्र्य

प्रत्येक व्यक्तीच्या संघटना तयार करण्याच्या आणि एकत्रितपणे वाटाघाटी करण्याच्या अधिकाराचा आम्ही आदर करतो. विशेषत: आमचे जागतिक मनुष्यबळ आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काम करते आणि जलद बदलाशी जुळवून ते सक्षम असले पाहिजे म्हणून, जिथे नियोक्ता आणि कर्मचारी एकमेकांपुढची आव्हाने अधिक चांगल्याप्रकारे समजून घेतील आणि ती पेलण्याचे मार्ग शोधतील, असे वातावरण तयार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. मुक्तपणे निवडलेल्या कर्मचारी प्रतिनिधींशी चांगला संवाद प्रस्थापित करून हे केले जाते.

## बालमजुरी नाही

आम्ही कोणत्याही प्रकारचे बालकांचे शोषण करत नाही किंवा खपवून घेत नाही आणि मुलांनी त्यांचे अनिवार्य शिक्षण पूर्ण करेपर्यंत आणि कोणत्याही परिस्थितीत, त्यांनी वयाची 15 वर्षे पूर्ण करेपर्यंत त्यांना आम्ही नोकरी देत नाही. हे गिव्हादानमधील नोकरीला लागू होते आणि ज्यांच्याबरोबर, आम्ही काम करतो असे आमचे भागीदार आणि पुरवठादार यांच्याकडून आमची तीच अपेक्षा आहे. तरुण कामगार व्यावसायिक काम करत असल्याचे आमच्या लक्षात येते पण ते कायदेशीरदृष्ट्या बाल कामगार नसतात, तेव्हासुद्धा आम्ही तरुण कामगारांचे नेहमीच संरक्षण व्हावे, त्यांच्या शिक्षणाच्या अधिकाराचे उल्लंघन होऊ नये म्हणून स्टेकहोल्डर्सना प्रशिक्षण आणि शिक्षण देतो.

## वेठबिगारी किंवा सक्तीचे काम किंवा मानवी तस्करी नाही

सर्व प्रकारची वेठबिगारी आणि सक्तीचे काम आमच्या तत्वांच्या विरुद्ध आहे. आम्ही कैदी कामगार, करारबद्ध कामगार आणि वेठबिगार, गुलाम कामगार किंवा कोणत्याही प्रकारची मानवी तस्करी यासह कोणत्याही प्रकारचे शोषण अथवा वेठबिगारी किंवा सक्तीचे काम करून घेत नाही किंवा ते सहन करत नाही. आमच्या पुरवठादारांनीसुद्धा याचे पालन करावे अशी आमची अपेक्षा आहे.

## मुक्त, पूर्व आणि माहितीपूर्वक संमती (एफपीआयसी) आणि जमिनीचे अधिकार

आमचा असा विश्वास आहे की जमीन ओळखीचा आणि संस्कृतीचा स्रोत दर्शवते आणि ती एक अतिशय मौल्यवान आर्थिक मालमत्ता आहे. आम्ही कोणतेही स्थानिक लोक किंवा स्थानिक समुदायांसह कोणत्याही व्यक्तीचा किंवा गटाचा मालमत्तेवरील आणि जमिनीवरील अधिकारांचा आणि हक्कांचा तसेच सांस्कृतिक अधिकारांचा आणि स्वत: ठरवण्याच्या अधिकाराचा आणि या संदर्भात भेदभाव न करण्याच्या अधिकाराचा आदर करतो. त्यामुळे आम्ही कोणत्याही प्रकारे जमीन बळकावणे, पाणी, जंगल किंवा खनिजे बळकावणे अशी कृत्ये करत नाही. हे आमच्या दृष्टीने मानवाधिकारांचे व्यवस्थात्मक उल्लंघन आहे. अशा व्यक्ती किंवा गटांसह मालमत्ता किंवा जमिनीच्या संदर्भात कोणत्याही वाटाघाटी करताना आम्ही मुक्त, पूर्व आणि माहितीपूर्वक संमती (एफपीआयसी), करारातील पारदर्शकता आणि प्रकटीकरण या तत्त्वांचे पालन करतो.

## आम्ही काम करत असलेल्या ठिकाणच्या समुदायांचा अधिकार

आमच्या कामाचा ज्या समुदायांवर परिणाम होतो तेथील लोकांच्या मानवाधिकारांचा आम्ही आदर करतो आणि संवेदनशील आणि वंचित गटांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, हे आम्ही जाणतो. आम्ही मानवाधिकारांवर होणारे विपरीत परिणाम शोधण्याचा प्रयत्न करतो आणि ते टाळण्यासाठी, कमीत कमी करण्यासाठी आणि/किंवा त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी योग्य पावले उचलतो. आम्ही आमच्या समुदायांच्या गरजा अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेण्यासह स्टेकहोल्डर्सबरोबरील संवादात नियमितपणे आणि व्यवस्थात्मकरित्या त्यांच्याशी संवाद साधतो. त्यापुढे जाऊन, आमच्या समुदायाशी संवादाद्वारे आणि कंपनीच्या विविध कार्यक्रमांद्वारे5, आम्ही काम करत असलेल्या ठिकाणी राहत असलेल्या समुदायांच्या मानवाधिकारांवर सकारात्मक परिणाम करण्याचा आम्ही प्रयत्न करतो.



[5] आमचे सामुदायिक प्रयत्न: http://www.givaudan-foundation.org/

# आमचा अंमलबजावणीचा प्रवास

## यथायोग्य तत्परता आणि स्टेकहोल्डर्सचा सहभाग

या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही सातत्याने मानवाधिकारांवरील परिणाम शोधतो, ते टाळतो आणि त्यांच्यावर उपाययोजना शोधतो, आमच्या उपायोजनांच्या परिणामकारकतेवर सतत लक्ष ठेवतो आणि ठराविक काळाने आमच्या कामगिरीचा अहवाल सादर करतो.

आमचा प्रवास सातत्याने सुधारणा करण्याचा आहे, हे आम्ही जाणतो. आम्ही जिथे काम करतो ते वातावरण सतत बदलत आहे आणि त्यामुळे आम्ही ज्या प्रकारे प्रतिसाद देतो त्याचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे. आम्ही हेही जाणतो की मानवाधिकार या गोष्टीवर आम्ही एकटे उपाययोजना करू शकत नाही. आम्ही शासन, स्वयंसेवी संस्था, आमचे कर्मचारी, पुरवठादार, ग्राहक, समुदाय आणि इतर सर्व संबधित स्टेकहोल्डर्सबरोबर काम करणे आवश्यक आहे. आमचे जबाबदार सोर्सिंग धोरण या धोरणात नमूद केलेल्या तत्त्वांचे पालन आमचे पुरवठादारसुद्धा करतील हे नेहमीच सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करते.

आम्ही आमच्या संपूर्ण ग्रुपमध्ये मानवाधिकार कार्यक्रम राबवत आहोत, ज्यामध्ये मानवाधिकारांचे मूल्यांकन आणि संवेदनशील किंवा वंचित गटांना आमच्या स्टेकहोल्डर्स संवादात सहभागी करून घेणे यांचासुद्धा समावेश आहे.

## धोरणाचे उल्लंघन झाल्यास उपाययोजना

मानवाधिकारांच्या कोणत्याही प्रकारच्या उल्लंघनासाठी आम्ही शून्य सहिष्णूता दर्शवतो आणि आमच्या तत्त्वांचे आणि बांधिलकीचे अनुपालन करण्यासाठी कठोर शासन, तक्रार आणि उपाययोजना प्रणालींचे पालन करतो.

चिंता व्यक्त करण्यासाठी आम्ही अनेक प्रणाली पुरवतो. या धोरणासंदर्भात कर्मचारी स्थानिक अनुपालन अधिकाऱ्याकडे, कॉर्पोरेट अनुपालन अधिकाऱ्याकडे किंवा कायदा विभागाकडे किंवा आमच्या अंतर्गत अनुपालन हेल्पलाईनद्वारे गोपनीयरित्या चिंता व्यक्त करू शकतात. तृतीय पक्ष ग्रुपच्या नैतिकता आणि अनुपालन प्रमुखांना इथे गोपनीयरित्या इमेल पाठवून चिंता व्यक्त करू शकतात: global.compliance@givaudan.com.

सर्व समस्या गिव्हादानच्या तपासणी करायच्या आवश्यकतेनुसार, कायदेशीर आवश्यकतांच्या अनुपालनानुसार आणि जिथे वश्याकता असेल तिथे कायदयाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना सहकार्य करत गोपनीय पद्धतीने हाताळल्या जातील. जो सद्भावनेने सल्ला मागतो किंवा गैरव्यवहाराचा अहवाल देतो त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा बदला गिव्हादान सहन करत नाही.

## शासन

प्रत्येक मानवाधिकाराच्या केंद्र क्षेत्राबद्दलच्या आमच्या बांधिलकीच्या अंमलबजावणीच्या जबाबदारीचे व्यवस्थापन आमच्या अंतर्गत व्यवस्थापन पदांकडून केले जाते. आम्ही मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी असलेल्या आमच्या बांधिलकीचे पालन सुनिश्चित करण्याची एकंदर जबाबदारी आमच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची आहे, त्यांना कार्यकारी समिती मदत करेल.

मानवाधिकारांच्या व्यवस्थापनासाठीची ही व्यापक शासन रचना हे सुनिश्चित करते की व्यवसायाचा प्रत्येक भाग त्याची जबाबदारी समजून घेतो आणि मानवाधिकारांचा आदर करण्यासाठीच्या त्याच्या योगदानाला पाठिंबा देतो.



कॅलव्हिन ग्रीडर
अध्यक्ष



गिल अँड्रीयर
मुख्य कार्यकारी अधिकारी